लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

विकणे आहे
मौजे नान्नज व अकोलेकाटी ता उत्तर सोलापूर येथील बागायत शेतजमीन सर्व सोयीनियुक्त विकणे आहे शेतामध्ये ५ बोअरवेल, शेततळे, मोटारपंप, सालगडी राहणेसाठी वस्ती, आमराई, ७० फूट खोल विहीर, ड्रीप पाईप लाईन, स्प्रिंकलर, द्राक्ष फाउंडेशनसह विकणे आहे
संपर्क: मनोरमा मल्टीस्टेट नान्नज शाखा
श्री पवार- 8600568860, 9763663792, 9545386261

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १६ वा | सोमवार, दि. २९ जुलै २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

कामिनी गांधी
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. अँड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग अँड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▸ फॅशन ड्रेस डिझायनिंग
▸ फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▸ प्रिंसेस ब्लाऊज ▸ अरी वर्क ▸ पार्टीवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
३६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025

# पावसाळ्यातही सोलापूरकरांना 4-5 दिवसांआडच पाणी; कधी मिळणार दररोज पाणी ?

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उन्हाळा असो की पावसाळा, सोलापूरकरांना मागील १२ ते १५ वर्षांपासून दररोज पाणी मिळत नाही. सध्या उजनी धरणाची प्लसच्या दिशेने वाटचाल सुरू असून चिंचपूर, औज बंधारे भरलेले आहेत.

हिप्परगा तलाव देखील पूर्ण क्षमतेने भरू लागला आहे. तरीदेखील सोलापूर शहराला सध्या चार व पाच दिवसाआड पाणीपुरवठा होतोय, हे विशेष.



सोलापूर शहरासाठी पहिल्यांदा १८८५मध्ये होटगी तलावावरून सिमेंट पाइपलाइनद्वारे पाणी आणण्यात आले. त्यानंतर १९३२ मध्ये शहरांतर्गत गावठाण भागात जलवाहिनी टाकण्यात आली. १९९६ मध्ये उजनीवरून सोलापूर शहरासाठी जलवाहिनी टाकून पाणी आणण्यात आले. त्यानंतर आता समांतर जलवाहिनी टाकली जात आहे. दरम्यान, अंदाजे १५ वर्षांपासून सोलापूरकरांना प्यायला सुद्धा दररोज पाणी मिळालेले नाही.

सुरवातीला एक-दोन दिवसाआड, नंतर तीन दिवसाआड आणि आता तर पाच दिवसाआड पाणीपुरवठा होतोय. शहराचा विस्तार होत असताना वाढत्या लोकसंख्येची गरज ओळखून पाणीपुरवठ्याचे ठोस नियोजन अपेक्षित होते, मात्र तसे झाले नाही. त्यामुळे स्मार्ट सिटी म्हणून जगभरात पोचलेले सोलापूरकर आजही चार-पाच दिवसाआड पाणी भरतात अशी वस्तुस्थिती आहे. मग, उजनी, औज, चिंचपूर, हिप्परगा पूर्ण क्षमतेने भरलेले असतानाही अशीच स्थिती आहे.

**निवडणुकीपूर्वी प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न**

विधानसभा निवडणुकीचा बिगूल १५ सप्टेंबरनंतर वाजणार असून आमदारकीसाठी ऑक्टोबरमध्ये मतदान होईल. नोव्हेंबरमध्ये (पान 2 वर..)

# सोलापुरातील आरोग्य सेवेच्या प्रश्नांवर खा. प्रणिती शिंदेंनी उठवला आवाज

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे या लोकसभेमध्ये जनतेच्या विविध मुद्द्यांवरती सातत्याने आवाज उठवताना दिसून येत आहेत त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील आरोग्याच्या प्रश्नाला वाचा फोडली.

सोलापूर जिल्ह्यातील सरकारी रुग्णालयांमध्ये सोयीसुविधांचा अभाव आहेत. ईसीजी, सोनोग्राफी मशीन, इसीजी मशीन यासारख्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांना प्रश्न विचारला.



खासदार प्रणिती शिंदे या सोलापूर मतदारसंघातील समस्या सोडवाण्यासाठी आग्रही आणि आक्रमक भूमिका घेताना दिसून येत आहेत. त्यांनी संसदेच्या अधिवेशनामध्ये तारांकित प्रश्नांच्या काळामध्ये त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रातून (पान 2 वर..)

# राष्ट्रीय लोक अदालत यशस्वीपणे संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे आदेशाप्रमाणे दि. 27 जुलै 2024 रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे सोलापूर शहर व सर्व तालुक्यामधील न्यायालयात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.



या लोकन्यायालयाचे उद्घाटन राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांनी तयार केलेले "एकमुठ्ठी आसमान" या गीताने करण्यात आले. यावेळी मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सोलापूर मो. सलमान आझमी, यांनी उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय लोकअदालत मध्ये जास्तीत जास्त प्रकरण मिटविण्यात यावे तसेच लोकअदालत मध्ये प्रकरण तडजोडी करून मिटविल्यास वादी व प्रतिवादी यांच्या मध्ये निर्माण झालेली द्वेष भावना सपुंष्टात येईल त्यामुळे एकमेकांबद्दल आदर निर्माण होईल यामध्ये दोन्ही पक्षाचा विजय होईल चलनक्षम दस्तावेज मधील प्रकरण लोक न्यायालयामध्ये मिटविल्यास वादीस पुर्णपणे न्यायालय मुद्रांक परत मिळेल पक्षकार यांचा वेळ, पैसा, श्रमही वाचेल असे प्रतिपादन केले. सदर उद्घाटन प्रसंगी पॅनलवरील सर्व न्यायिक अधिकारी, पी. एस. खुणे, जिल्हा न्यायाधीश-2. महाराष्ट्र व गोवा बार कॉन्सिलचे सदस्य श्री. मिलिंद थोबडे, जिल्हा सरकारी वकील श्री प्रदीपसिंह रजपूत, सोलापूर विधिज्ञ संघाचे अध्यक्ष श्री अमित आळंगे, विधिज्ञ संघाचे सर्व पदाधिकारी, सौ. पल्लवी पैठणकर जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक, लोकअभिरक्षक कार्यालयातील सर्व विधिज्ञ, तसेच जिल्हा न्यायालय सोलापूर कर्मचारी उपस्थित होते.

लोक न्यायालयामध्ये जिल्हयात एकूण 39 पॅनल निर्मिती करण्यात आली होती. सदर लोक न्यायालयामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार वाहन प्रकरणे, भुसंपादन, दरखास्त व कलम 138 चलनक्षम कायदयाची तसेच कौटुंबिक वाद वगैरेची न्यायप्रविष्ट प्रकरणे व तसेच बँका, टेलिफोन कंपनी, विविध वित्तीय संस्था यांची दाखलपूर्व प्रकरणे तसेच वाहतुक शाखा, सोलापूर ई-चलन प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. लोक न्यायालय हे प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर सलमान आझमी, व दिवाणी न्यायाधीश व स्तर तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर उमेश देवर्षी यांच्या मार्गदर्शनाखाली व वकिल संघटना व पक्षकार यांचे सहकार्याने संपन्न झाले.

लोक अदालतीमध्ये 1 लाख 22 हजार 906 प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती, त्यापैकी 7 हजार 87 प्रलंबित प्रकरणात तडजोड झाली व 4 हजार 326 दाखलपुर्व प्रकरणे असे एकूण 11 हजार413 आपापसात तडजोडीने निकाली काढण्यात आली. व रु 1144562834/- (अक्षरी एकशे चौदा कोटी पंचेचाळीस लाख बासष्ठ हजार आठशे चौतीस एवढया रकमेची तडजोड करण्यात आली.

या लोक अदालाती मध्ये शहर वाहतूक व ग्रामीण शाखा सोलापूरचे ई-चलनद्वारे 20 लाख 55 हजार इतकी रक्कम वसूली झाली.

सोलापूर जिल्हा न्यायालयातील पॅनलवर न्यायाधीश वाय. ए. राणे, श्रीमती, जे. एम. काकडे, एस. डी. गावडे, पी. पी. पेठकर, डी. आर. भोला, व्ही. एम. रेडकर, एस. आर. सातभाई, डी. जी. कंखरे, एस. पी. पाटील, व्ही. पी. कुंभार, श्रीमती एम. के कोठुळे श्रीमती एम. पी. मर्डेकर, श्रीमती व्ही. ए. कुलकर्णी या न्यायीक अधिकाऱ्यांनी काम पाहिले. तसेच पॅनल सदस्य म्हणून लोकअभिरक्षक कार्यालयातील विधिज्ञ सौ स्नेहल राऊत, झुरळे, सोलनकर, रेवण पाटील, नवले, म्हेत्रे, श्रीमती किणगी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण पॅनलवरील कुर्ले व श्रीमती मोरडे यांनी काम पाहिले. (पान 2 वर..)

# मोहोळ शहर कडकडीत बंद



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** अनगर येथे नव्यानेच मंजूर करण्यात आलेल्या अप्पर तहसील कार्यालयाच्या विरोधात मोहोळ तालुक्यातील जनतेत संतापाची लाट उसळली आहे. त्याचाच एक भाग म्हणून सरकारच्या या निर्णयाविरोधात मोहोळ शहरात शनिवारी (दि. २७) कडकडीत बंद पाळण्यात आला. शासकीय विश्रामगृहावर झालेल्यासर्वपक्षीय बैठकीत अप्पर तहसील कार्यालयाच्या मंजुरीचा आदेश रद्द होईपर्यंत माजी आमदार राजन पाटील आणि आ.यशवंत माने यांना प्रत्येक गावात प्रवेश बंदी करण्याचा सवार्नुमते ठराव करण्यात आला.कोणत्याही गावाची मागणी नसताना आणि मोहोळ येथील तहसील कार्यालयावर कामाचा कोणताही ताण नसताना अनगर येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर केल्याचा आदेश आल्यानंतर तालुक्यात संतापजनक प्रतिक्रिया उमटण्यास सुरुवात झाली होती. अनगर येथील अप्पर कार्यालयामुळे मोहोळ शहराचे महत्व आपसूकच कमी होणार आहे. त्यातच मोहोळ शहरातील जनतेने नेहमीच राजन पाटील यांना विरोध केला असून शिवाय त्यांना कधीही राजकीय साथ

दिली नाही. त्यामुळे या शहरातील जनतेबद्दल त्यांच्या मनात मोठा आकस आहे. या आकसापोटी या भागातील जनतेने आपल्या समोर नाक घासले पाहिजे या भावनेतून या कार्यालयाचा घाट घातला आहे, अशा प्रतिक्रिया सर्वपक्षीय नेत्यांनी व्यक्त केल्या.शेटफळ, पेनूर आणि नरखेड या गावातील नागरिकांना मोहोळ शहरात जाण्यायेण्यासाठी दळणवळणाची मोठी सोय आहे. मात्र, अनगरला जाने-येने या गावातील नागरिकांसाठी जिकरीचे बनणार आहे. असे असतानाही या गावातील ग्रामस्थांनी आपल्याच गावात शासकीय कामासाठी यावे यामागे राजकीय सूड उगविण्याचा राजन पाटील यांचा हेतू असल्याचेही या बैठकीत नेत्यांनी बोलून दाखविले.या बैठकीला जेष्ठ नेते मनोहरभाऊ डोंगरे, दीपक गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) राज्याचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील, मानाजी माने, माजी सभापती विजयराज डोंगरे,प्रदेश सदस्य संतोष पाटील, संजय क्षीरसागर, उद्योजक राजाभाऊ खरे,रमेश बारसकर, अॅड. पवन गायकवाड,पद्माकर देशमुख, महेश देशमुख, विक्रम देशमुख, चरणराज चवरे, बाळासाहेब गायकवाड, सिमाताई पाटील,काका देशमुख, विनय पाटील, सतीश पाटील,भीमराव वसेकर, किशोर पवार,सोमेश क्षीरसागर, दादासाहेब पवार,सुनील चव्हाण, सुशील क्षीरसागर,सतीश काळे, अशोक भोसले, अंकुश आवताडे, आदी उपस्थित होते.मोहोळ तहसील कार्यालयाचे कारण आणि मागणी नसताना विभाजन केल्याने शहराच्या बाजारपेठेवर मोठा परिणाम होणार आहे. दुय्यम निबंधक कार्यालयाचे विभाजन केल्याने शहराच्या अर्थकारणावर अगोदरच परिणाम झाला आहे. त्यातच पुन्हा अप्पर कार्यालयाचा प्रयोग झाल्याचा मुद्दा उपस्थित करून शहरातील सर्वपक्षीय नेत्यांनी मोहोळ बंदचे आव्हान करण्यात आले होते. त्याला मोठा प्रतिसाद मिळाला. शहरातील बाजारपेठ कडकडीत बंद ठेवण्यात आली होती.

# अखेर उजनी प्लस मध्ये, 5 दिवसांत धरण शंभरी गाठणार; सोलापूरला मोठा दिलासा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर आणि पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी महत्वाचे असणारे उजनी धरण अखेर प्लसमध्ये आले आहे. आज सकाळी 9 वाजता धरणाने शून्य पातळी ओलांडली आहे.ऐतिहासिक नीचांकी पातळीनंतर केवळ 54 दिवसात उजनी धरण मृत साठ्यातून जिवंत साठ्यात आले आहे. गेल्या 54 दिवसात धरणात तब्बल 33 टीएमसी पाणी आले आहे. असाच पाऊस सुरु राहिल्यास धरण पुढील 5 दिवसात 100 टक्के भरण्याची शक्यता आहे.

गेल्या दोन ते तीन दिवसांपासून पुणे जिल्ह्यासह उजनी धरण क्षेत्रात चांगला पाऊस सुरु आहे. त्यामुळं धरणाच्या पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. धरणातील पाणीसाठा मायनसमध्ये प्लस मध्ये गेलं आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान पाहायला मिळत आहे. पुणे जिल्ह्यात जोरदार पाऊस झाल्यामुळं तेथील धरणासाठ्यात मोठी वाढ झालीय. त्यामुळं पुणे जिल्ह्यातील धरणातून उजनी धरणात पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

उजनी धरणात 1 लाख 60 हजार क्युसेक्सने पाण्याचा विसर्ग सुरु ऐतिहासिक नीचांकी पातळी गाठल्यानंतर केवळ 54 दिवसात उजनी पुन्हा मृत साठ्यातून जिवंत साठ्यात आले आहे. असाच पाऊस पुढील चार ते पाच दिवस राहिल्यास उजनी धरण या पाच दिवसात 100 टक्के भरणार आहे. सध्या उजनी धरणात 1 लाख 60 हजार क्युसेक्सने पाणी जमा होत आहे. दुपारनंतर ही आवक 2 लाख क्युसेक्सपर्यंत वाढणार आहे. या पद्धतीच्या पाण्याच्या आवकेमुळं आज रात्रीपर्यंत धारण 25 टक्के जिवंत साठ्यात पोहोचणार असल्यानं पुढील चार ते पाच दिवसात धरण 100 टक्क्यांची पातळी गाठू शकणार



आहे. गेल्या वर्षीच्या भीषण पाणी टंचाईमुळं उजनी धरण इतिहासातील सर्वात नीचांकी म्हणजे वजा 60 टक्के इतक्या निचांकी पातळीला पोहोचले होते. मात्र, जून सुरु होताच पावसाने साथ दिल्याने धरणात हळू हळू पाणी जमा होण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या चार दिवसतातील पावसाने धरणात मोठ्या प्रमाणात पाणी जमा झाल्यानं 26 जुलै रोजी सकाळी 9 वाजता धरणाने शून्य पातळी ओलांडत जिवंत साठ्यात प्रवेश केला आहे.

उद्या सकाळी उजनी धरण 25 टक्के पातळी ओलांडणार सध्या पुणे, लोणावळा, भीमाशंकर या परिसरात जोरदार पाऊस सुरु आहे. त्यामुळे मुळा, मुठा, इंद्रायणी या भीमा खोऱ्यातील नद्यांतून मोठा विसर्ग उजनीकडे येत आहे. लोणावळा (पान 2 वर..)

## मनोज जरांगे पाटील यांच्या शांतता रॅलीसाठी लाखो समाज बांधव एकवटणार!

### शहरात मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅली नियोजन बैठक संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या दुसऱ्या टप्प्यातील मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅलीची नियोजन बैठक शहरातील राजर्षी शाहू महाराज सभागृह याठिकाणी संपन्न झाली. यावेळी शांतता रॅलीसाठी लाखो समाज बांधव एकवटणार असल्याचा निर्धार करण्यात आला. याच ठिकाणी संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रस्तावनेमध्ये प्रा. गणेश देशमुख यांनी मराठा आरक्षण आंदोलनात प्रभावी भूमिका बजावणारे मनोज जरांगे पाटील हे दुसऱ्या टप्प्यातील रॅलीची सुरुवात सोलापुरातून करणार आहेत असे सांगून सात



ऑगस्ट ही तारीख निश्चित करण्यात आली असल्याचे सांगितले.

यावेळी रॅली संदर्भातील महत्त्वाच्या विविध कामासंदर्भात कमिटी स्थापन करण्यात आल्या. समाज बांधवातील काही जणांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. त्यामध्ये मराठा मोर्चा प्रमाणे शांतता रॅली ही भव्य स्वरूपात करण्याचे नियोजन करण्याचा निर्धार केला. (पान 2 वर..)




निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा आणि फिजिओथेरपी सेंटर
कितीही जुने पॅरालिसिस असो, आयुर्वेदिक उपचार पद्धतीने १५ ते २० दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे ,बेडवर आहात? काळजी करू नका.. खात्रीशीर उपचार १००% गॅरंटी आयुर्वेदिक तज्ञांच्या निगराणीमध्ये
नातं आपुलकीचं,विश्वासाचं,जिव्हाळ्याचं, माणुसकीच अन् आधाराचं..
समाजातील प्रत्येक घटकाशी आपूलकीचे व माणूसकीचं नात जपणारी संस्था
खंडोबा माळ रोड, लोहगाव, पुणे
संपर्क: 9503310568

## संपादकीय

# असंतोष आणि वास्तव

मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प मंगळवारी सादर करण्यात आला. आज म्हणजे शनिवारी निती आयोगाची बैठक होणार आहे. इंडिया आघाडीतील अनेक पक्षांनी आयोगाच्या बैठकीवर बहिष्कार टाकला आहे. अर्थसंकल्पात दोन राज्यांना झुकते माप देण्यात आल्याचा त्यांचा आरोप आहे. अन्य राज्यांच्या तोंडाला पाने पुसण्यात आली आहेत. सरकार आपल्या स्थैर्यासाठी हा पक्षपातीपणा करत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यांचा असंतोष योग्य आहे, त्यांना नाराजी व्यक्त करण्याचा हक्कही आहे. मात्र केवळ अर्थसंकल्पात अन्य राज्यांचा तपशीलवार उल्लेख केला नाही म्हणून त्यांना काहीच मिळाले नाही असा आरोप करणे हेही वास्तवापासून पाठ फिरवण्यासारखे आहे. केंद्र सरकारनेही कदाचित त्यांच्या भवितव्याचा विचार करून काहींना उजव्या तर काहींना डाव्या हाताने वाढले असेल हे मान्य करून आपले विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करायचे असेल तर भविष्यात असे करून चालणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

वास्तविक अर्थसंकल्प म्हटला की विरोधी पक्ष काहीना काही कारण काढून त्याचा विरोध करतातच. यावेळीही त्यापेक्षा फार काही वेगळे झाले नाही. अर्थसंकल्पात बिहार आणि आंध्र प्रदेश या राज्यांच्या संदर्भात ज्या घोषणा केल्या गेल्या आहेत ते आता अंसतोषाचे कारण आहे. बिहारला तब्बल ६० हजार कोटी तर आंध्र प्रदेशला १५ हजार कोटी रुपए देण्यात आले आहेत. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारसाठी या दोन राज्यांतील सत्ताधारी पक्षांचा पाठिंबा आवश्यक असल्याचे त्यामागे कारण. तथापि, ते एकमेव कारण नाही. बिहार देशातील बिमारू राज्यांपैकी एक आहे व हे सगळ्यांना मान्य आहे, तर आंध्र प्रदेशचे जेंव्हा विभाजन झाले तेंव्हाच तत्कालीन सरकारने त्यांना विशेष अर्थसहाय्य केले जाईल असे आश्वासन दिले होते. आंध्रला झुकते माप दिल्याबद्दल ओरड करणाऱ्या कॉंग्रेस पक्षाचे एका गोष्टीकडे सोईस्कर दुर्लक्ष होते आहे. त्यांनीच आंध्र प्रदेशच्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत राज्याला पुढील दहा वर्षांसाठी विशेष श्रेणीचा दर्जा दिला जाण्याचे आश्वासन दिले होते.

बिहारमध्ये विशेष आर्थिक सहाय्य केले जाईल असा शब्द कॉंग्रेस आणि त्यांचा सहकारी पक्ष असलेल्या राष्ट्रीय जनता दलानेही दिला होता. आता दिल्लीतील नेते एक बोलतात आणि राज्यातील नेते दुसरेच बोलतात हे किमान कॉंग्रेसला शोभणारे नाही. लालूप्रसाद यादव यांच्या पक्षाकडून जशी अपेक्षा होती तसेच त्यांचे बोलणे आहे. महाराष्ट्राच्या संदर्भातही महाविकास आघाडीतील सर्वच पक्षांनी केंद्राला लक्ष्य केले आहे. तथापि, रेल्वेने काय दिले आणि अन्य योजनांसाठी महाराष्ट्राला काय देण्यात आले याकडे त्यांचे दुर्लक्ष होते आहे. अर्थसंकल्पात त्याबाबत तपशीलवार बोलले गेले नसल्यामुळे कदाचित असे झाले असावे. त्याचाही तपशील समोर आला आहे. तामिळनाडू, झारखंड, हिमाचल प्रदेश अशा सगळ्याच राज्यांनी त्यांना काहीच मिळाले नसल्याची ओरड केली आहे.

उत्तर प्रदेशातील विरोधी पक्षांनीही तेच आरोप केले आहेत. प्रत्यक्षात पूर्वोदय योजनेत बिहार आणि आंध्र प्रदेशसोबतच ओडिशा, बंगाल आणि झारखंडचाही समावेश करण्यात आला आहे. पूरग्रस्त आसामसाठी विशेष निधीची तरतूद केली गेली आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू काश्मीरच्या औद्योगिक विकासासाठी विशेष सहाय्याची तरतूद आहे. अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात प्रत्येक राज्याचे नाव घेतले नाही याचा अर्थ त्या सर्वच राज्यांवर अन्याय केला असे होत नाही व तसा समज कोणी करूनही देऊ नये. केवळ आपण विरोधी पक्षात आहोत म्हणून टीका करण्यापेक्षा अभ्यास करून आपल्या पक्षातील आणि राज्यातील लोकांना सर्व तपशील राजकीय पक्षांनी सांगणे आवश्यक ठरते.

विशेष आर्थिक दर्जा दिला नाही तर केंद्राचा तर संयुक्त जनता दल आणि तेलगु देसम पक्ष केंद्र सरकारचा पाठिंबा काढून घेतील अशी मांडणी सरकार स्थापनेच्या पहिल्या दिवसापासून केली जाते आहे. मात्र या राज्यांना तसा दर्जा देता येऊ शकत नाही हे सरकारकडून संसदेतच स्पष्ट करण्यात आले आहे. ती नाराजी दूर करण्यासाठी त्यांना मोठे पॅकेज दिले असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. या दोन्ही राज्यांचे विभाजन झाले आहे व त्यांची आर्थिक स्थिती पूरेशी भक्कम नसल्याचे कोणीही अमान्य करणार नाही. मात्र याच दोन राज्यांना जो न्याय दिला तसाच न्याय अन्य राज्यांनाही केंद्राने द्यावा कारण त्यांची स्थितीही फारशी भक्कम नाही. सर्वच राज्यांना समान पध्दतीने संधी उपलब्ध करून देणे ही केंद्र सरकारचीच जबाबदारी आहे. प्रत्येक राज्यात आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे हे राज्यांएवढेच त्यांचेही दायित्व आहे.

त्यात जर कुठे पक्षपातीपणा होत असल्याचे जाणवले तर असंतोषाचा स्वर उमटणे स्वाभाविक आहे. हा स्वर दृढ होत गेला की केंद्र आणि राज्य सरकार यांच्यात संघर्ष सुरू होतो आणि त्यात अंतिमतः जनताच भरडली जाते कारण दोन्ही सरकारे तिनेच निवडून दिली असतात आणि आपलीच सरकारे असून आपल्याला संधींपासून वंचित राहावे का लागते हे नागरिकांच्या दृष्टीने अनाकलनीय असते. अशा स्थितीत सरकारांचे प्रथम कर्तव्य ठरते की त्यांनी वास्तवाकडे लक्ष देऊन संतुलन साधण्याचा प्रयत्न करणे. राज्याचा आणि संपूर्ण देशाचा संतुलित विकास होणे महत्वाचे आहे. त्यात पक्षपातीपणा किंवा राजकीय हेतूंसाठी खोटे आरोप या दोन्ही बाबींना थारा नको.

पान १ वरून

## पावसाळ्यातही सोलापूरकरांना...

सरकार स्थापन झाल्यानंतर तीन ते चार महिन्यातच म्हणजेच फेब्रुवारी-मार्च महिन्यात जिल्हा परिषदा, महापालिका, नगरपालिका, पंचायत समित्यांसाठी मतदान होईल. तत्पूर्वी, सोलापूर शहराच्या पाण्याचा प्रश्न सोडवावाच लागणार आहे. त्या दृष्टीने प्रशासकीय पातळीवर प्रयत्न सरू आहेत.

**उजनी पूर्ण भरल्यावर चार दिवसाआड पाणी**

उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर संपूर्ण सोलापूर शहराला चार दिवसाआड पाणी देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यावेळी विजेचाही अडथळा असणार नाही, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांच्या नेतृत्वात सध्या समांतर जलवाहिनीचे काम सुरू आहे. हे काम पूर्ण झाल्यावर पाणीपुरवठ्याचे दिवस आणखी कमी होतील, असा त्यांना विश्वास आहे.

- शहरातील पाण्याच्या वेळा
- पहाटे चार ते रात्री साडेबारापर्यंत
- ९८ चावीवाल्यांवर पाणी सोडण्याची जबाबदारी
- पाण्याच्या ६२ टाक्यांवरील वॉल रिमोट तथा बटणांवर
- दोन दिवसाआड पाणीपुरवठ्याचे नियोजन

नोव्हेंबरमध्ये समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यावर त्याच महिन्यात ट्रायल घेतली जाणार आहे. त्यानंतर सोलापूर शहराला किमान दोन दिवसाआड पाणीपुरवठा होईल, असा विश्वास आहे. त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

– **व्यंकटेश चौबे,** प्रभारी सार्वजनिक आरोग्य अभियंता, सोलापूर महापालिका

# ईपीएस-९५ पेंशनधारकांच्या उत्थानासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा

आज राज्यात १५ ते २० लाख ईपीएस-९५ पेंशनधारक आहेत. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांना न्याय मिळेल अशी अपेक्षा होती.परंतु निराशा हाती आली.परंतु त्याची पुर्तता राज्य सरकार एखाद्या योजनेअंतर्गत अवश्य करू शकते व यावर राज्य सरकार तोडगा सुध्दा अवश्य काढू शकते यात दुमत नाही. आता राज्य सरकारने एखाद्या योजनेअंतर्गत यावर तोडगा काढुन ईपीएस पेंशन धारकांना सहकार्य करणे गरजेचे आहे.अर्थसंकल्पीय अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पेंशन बद्दल काहीतरी तोडगा निघेल व न्याय मिळेल या आशेने देशातील दिड करोड पेंशनधारक सरकारच्या निर्णयाकडे मोठ्या आशेने पाहत होते.परंतु चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनात केंद्र सरकारने ईपीएस-९५ पेंशनधारकांना निराश केल्याचे दिसून आले.परंतु महाराष्ट्रातील १५ ते २० लाख ईपीएस-९५ पेंशन धारकांना महाराष्ट्र सरकार अवश्य दिलासा व न्याय देवू शकते यात दुमत नाही.कारण महाराष्ट्र सरकारने राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी अनेक योजना महत्वपूर्ण योजना अंमलात आणल्यात व या योजनांचा लाभ राज्यातील जनतेला मिळत आहे ही स्वागतार्ह बाब आहे याचे मी मनापासून स्वागत करतो.आजही महाराष्ट्रातील ईपीएस-९५ पेंशन धारकांना ८००,१०००,३००० रुपए अशा रूपात तुटपुंजी पेंशन मिळत आहे.अशा परिस्थितीत महाराष्ट्र सरकारने ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या मदतीसाठी सरसावले पाहिजे.कारण राज्यात होवून घातलेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर १५ ते २० लाख पेंशन धारक व त्यांच्या परिवार यांचा फायदा सरकारला येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत अवश्य होईल.त्यामुळे ईपीएस पेंशन धारकांना राज्य सरकार कडून मदत करने अपेक्षित आहे.महाराष्ट्र सरकारने नुकतीच लाडकी बहिण योजना अंमलात आणली व या योजनेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद सुध्दा मिळत आहे.या पाठोपाठ सरकारने लाडका भाऊ योजना अंमलात आणली यांचाही युवकांना अवश्य लाभ होईल.या सर्व योजना पहाता ६० ते ८० वयाच्या ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पेंशनमध्ये भर टाकण्याचे काम महाराष्ट्र सरकारने केले पाहिजे अशी ईपीएस-९५ पेंशन धारकांची इच्छा आहे. कारण राज्याचा प्रत्येक कामगार हा शिल्पकार आहे;त्यामुळे देश घडविण्यासाठी नेहमीच त्याचा हातभार लावत असतो.ज्या पेंशन धारकांना ईपीएफओ कडून ८००,१०००,३००० रुपए इतकी पेंशन मिळत आहे यात महाराष्ट्र सरकारने थोडा भर टाकुन एखाद्या योजनेअंतर्गत कमीत कमी ५००० रूपयांपर्यत करावी अशी अपेक्षा पेंशन धारकांना आहे. याकरीता सरकारने ईपीएस-९५ पेंशनधारकांसाठी "लाडके माय-बाप योजना" अंमलात आणुन या योजनेअंतर्गत वृध्द ईपीएस-९५ पेंशन धारकांना सहकार्य करून सरकारने मदतीचा हात सामोर केला पाहिजे.कारण वाढती महागाई, इलेक्ट्रिक बिल,घर टॅक्स, औषधोपचार तुटपुंज्या पेंशनमध्ये ईपीएस-९५ पेंशन धारकांना पेलवत नाही.त्यामुळे वृद्धांसाठी मदतीचा हात सामोर करने सरकारचे सुध्दा प्रथम कर्तव्य आहे असे मला वाटते.कारण ईपीएस-९५ पेंशनधारक तुटपुंज्या पेंशनमध्ये "जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही". अशी कठीण परिस्थितीत आज ईपीएस-९५ पेंशन धारकांची झाली आहे. ईपीएस पेंशन धारक आशावादी आहे.त्यामुळे राज्य सरकारने ईपीएस-९५ पेंशनधारकांसाठी "लाडके माय-बाप योजना" अंमलात आणुन सहकार्य करणे अपेक्षित आहे.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## सोलापुरातील आरोग्य सेवेच्या...

मिळणाऱ्या सोयी सुविधामध्ये वाढ करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. यावेळी प्रणिती शिंदे म्हणाल्या की, देशात आणि महाराष्ट्रामध्ये अनेक सरकारी रुग्णालये आहेत. ज्यामध्ये सोयी सुविधाचा अभाव आहे. जे अद्यापही इनल्युकवेट आहे. या ठिकाणी सोनिग्राफी, इसीजी या सारख्या सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे अनेक लोकांना शहरातील सिव्हील हॉस्पिटल येथे यावे लागते. साधे दिव्यांग दाखल्याकरीता देखील दिव्यांग ब्यक्तींना शहरातील सिव्हिल रुगनालायस भेट द्यावी लागते. दिव्यांग प्रमाणपत्र देण्यासाठी जे संकेतस्थळ आहे तेही मागील तीन महिन्यापासून बंद पडले आहे. त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.

साधा ईसीजी काढण्याकरिता नागरीकांना सिव्हील हास्पिटल येथे यावे लागते. त्यामुळे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून येणाऱ्या काळात. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत का ? खासदार प्रणिती शिंदे यांनी आरोग्य मंत्री नड्डा या यांना विचारला.

यावर उत्तर देताना नड्डा यांनी आरोग्य सुविधा देण्याबाबत सरकार कटिबद्ध असून, नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा कशाप्रकारे मिळतील यासाठी प्रयत्न केले जातील असे उत्तर नड्डा यांनी दिले. तसेच नड्डा पुढे म्हणाले की, सरकारने जी व्यवस्था केली गेली आहे ती अशी आहे की प्राथमिक आरोग्य केंद्रामधून आपण 106 औषधे मोफत देत आहोत आणि 14 तपासणी मोफत करीत आहोत.

## राष्ट्रीय लोक अदालत यशस्वीपणे...

**स्पेशल ड्राईव्ह**

लोकन्यायालयाच्या अगोदर मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार 5 दिवस स्पेशल ड्राईव्ह प्रत्येक प्रथम न्यायदंडाधिकारी न्यायालयात मेण्यात आला. सोलापूर जिल्हयामध्ये सदर पाच दिवसांमध्ये 3442 प्रकरणे निकाली काढण्यात आली.

**लोकन्यायालयाची मुद्देसूद माहिती खालीलप्रमाणे :**

प्रलंबित प्रकरणे- एकूण ठेवलेली प्रलंबित प्रकरणे 57012. एकूण तडजोड झालेली प्रलंबित प्रकरणे 7087

प्रलंबित प्रकरणातील तडजोड रक्कम 965803393/-

दाखलपूर्व प्रकरणे- एकूण ठेवलेली दाखलपूर्व प्रकरण 65894, एकूण तडजोड झालेली दाखलपूर्व प्रकरणे 4326

दाखलपूर्व प्रकरणातील तडजोड रक्कम- 178759441/ . ऑनलाईन व व्हॉट्सअप (आभासी पध्दतीने) तडजोड प्रकरणे 28 . तडजोड झालेली वैवाहिक प्रकरणे 46

**तालुका निहाय प्रकरणांची माहिती**

तालुका विधी सेवा समितीचे नांव- सोलापूर - एकूण तडजोड प्रकरणे -5086 तडजोड रक्कम -372868168, अक्कलकोट- एकूण तडजोड प्रकरणे-783, तडजोड रक्कम- 12259375, बार्शी- एकूण तडजोड प्रकरणे-2155, तडजोड रक्कम- 263715245. माढा- एकूण तडजोड प्रकरणे-848, तडजोड रक्कम -239444718. मोहोळ- एकूण तडजोड प्रकरणे -154, तडजोड रक्कम -26565407. माळशिरस - एकूण तडजोड प्रकरणे -1033, तडजोड रक्कम-59987417. मंगळवेढा- एकूण तडजोड प्रकरणे-150, तडजोड रक्कम -32929769. पंढरपूर- तडजोड प्रकरणे-164, तडजोड रक्कम -61880654. करमाळा- तडजोड प्रकरणे -257, तडजोड रक्कम -64054834. सांगोला - तडजोड प्रकरणे-783, तडजोड रक्कम -1085724.

तसेच सदरची लोक अदालत यशस्वी करण्याकरिता जिल्हा न्यायाधीश आर जे कटारिया, मुख्य न्याय दंडाधिकारी श्री विक्रमसिंह भंडारी, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर शंतनु जहागीरदार,धर्मदाय उपायुक्त प्रवीण कुंभोजकर, न्यायाधीश श्रीमती दीप्ती कोळपकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अशी माहिती अधिक्षक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर ए.जी नदाफ यांनी दिली.

## अखेर उजनी प्लस मध्ये, 5 दिवसांत...

परिसरात पावसामुळं सध्या खडकवासला 14 हजार, मुळाशी 11 हजार, चासकमान 6 हजार, कासारसाई 1600, पवना 2 हजार तर भीमाशंकर परिसरातील पावसामुळे वाडीवाले धरणातून 2200 क्युसेक विसगार्ने पाणी सोडले जात आहे. थोड्या थोड्या वेळाने पावसाची परिस्थिती पाहून हे आकडे सातत्याने कमी जास्त होत आहेत. काल सोडलेल्या पाण्यामुळे आज दुपारीनंतर उजनी धरणात तब्बल 2 लाख क्युसेक्स विसगार्ने पाणी जमा होऊ लागणार आहे. पाण्याची तुफानी आवक पाहता उद्या सकाळी उजनी धरण 25 टक्के पातळी ओलांडणार असून असाच पाऊस सुरु राहिला तर मात्र पुढील चार दिवसात धारण 100 टक्के भरण्याची शक्यता आहे.

## मनोज जरांगे पाटील यांच्या शांतता...

लाखो समाज बांधव एकत्र येणार असल्याने व्यवस्थापन, मराठा स्वयंसेवक, पार्किंग , पाणी, मोबाईल स्वच्छतागृह, महिला संदर्भातील नियोजन, रुग्णवाहिका, पोलीस प्रशासनाची दुवा साधणारी कमिटी, तालुका निहाय होणाऱ्या बैठका यांची माहिती देण्यात आली.

**असे असेल नियोजन...**

- 7 ऑगस्ट रोजी शांतता रॅली
- दररोज सायंकाळी 6 ते रात्री 10 कार्यालय सुरू.
- बैठका आणि नियोजन कार्यालयातून चालेल.
- प्रस्तावना प्रा. गणेश देशमुख
- उद्यापासून मराठा समन्वयकांचा जिल्हा दौरा. * दिनांक 28 रोजी सकाळी 11 बार्शी ,दुपारी 2 करमाळा, सायंकाळीं 6 वाजता माढा.
- दिनांक 29 – दुपारी 2वाजता माळशिरस सायंकाळीं 6 वाजता मोहोळ
- दिनांक 30 सकाळी 11 मंगळवेढा, दुपारी 2 सांगोला , सायंकाळीं 6 पंढरपूर
- दिनांक 31 सकाळी 11 वाजता अक्कलकोट सायंकाळी 6 वाजता दक्षिण आणि उत्तर तालुका
- बैठकी मध्ये सर्व प्रकारचे नियोजन यावर चर्चा झाली
- सोलापूर शहरातील बैठका या 1 तारखेपासून सुरू.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालखी मार्ग व पंढरपूर शहरातील स्वच्छतेबाबत प्रशासनाचे कौतुक केले





**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** "आषाढी शुद्ध एकादशी दिनांक 17 जुलै 2024 रोजी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक शासकीय महापूजा केली. बा विठ्ठला शेतकरी, कष्टकऱ्यांना सुखी ठेवून त्यांना समृद्धी येऊ दे.. असे साकडे मुख्यमंत्री यांनी विठ्ठल चरणी घातले. यावर्षीच्या वारीला किमान 15 ते 18 लाख भाविक आलेले होते. किंबहुना प्रशासनाने मागील दोन महिन्यापासून एवढ्या मोठ्या संख्येने भाविक वारीला येतील हे गृहीत धरून पालखी मार्ग व पंढरपूर शहरात वारकरी व भाविकांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच गर्दीवर नियंत्रण ठेवणे, गर्दीत कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही यासाठी ड्रोन कॅमेरा व सीसीटीव्ही च्या माध्यमातून दक्ष राहणे तसेच चंद्रभागा नदीमध्ये कोणतीही आपत्ती जनक परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी प्रयत्न करणे व या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक वारकरी व भाविकाला विठ्ठलाच्या दर्शनाबरोबरच येथील स्वच्छता व सुविधा देऊन समाधानी करणे यासाठी नियोजनबद्ध काम सुरू होते. जिल्हा प्रशासन प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद प्रत्येक बाबीवर अत्यंत बारकाईने लक्ष ठेवून सर्व कामे सुरळीतपणे होत आहेत याची खात्री स्वतः करत होते, व यासाठी 11 जुलैपासून ते पंढरपूर येथेच मुक्कामी होते."

**भाविकांची संख्या व सोयी सुविधा**

आषाढी वारी 2024 मध्ये मागील वर्षीच्या दीडपट भाविक येतील हे गृहीत धरून जिल्हा प्रशासनाने पालखी मार्ग विसावा व मुक्कामाची ठिकाणे व पंढरपूर शहर, वाखरी पालखी तळ तसेच 65 एकर येथे वारकरी, भाविक यांच्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या होत्या. यामध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी, 15 लाख पाणी बॉटल व मँगो ज्यूस, पाण्याचे टँकर, पालखीतळाचे मुरमीकरण, मुक्कामाच्या ठिकाणी वॉटरप्रूफ मंडप, चंद्रभागा वाळवंटात तात्पुरती स्नानगृहे उपलब्ध करणे, स्तनदा मतांसाठी हिरकणी कक्ष, ठिकठिकाणी आरोग्य पथके दूचाक्कीवर आरोग्य दूत, पालखी मार्गावरील अतिक्रमणे काढणे, मोबाईल टॉयलेट, सुलभ शौचालये, व्हीआयपी दर्शन बंद, दर्शन रांगेत घुसखोरी होणार नाही याची काळजी या सुविधांचा समावेश होतो. वारीत किमान 15 ते 18 लाख भाविक गृहीत धरून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सर्व सुविधा व्यवस्थितपणे वारकऱ्यांना मिळतील यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणांना निर्देश दिलेले होते.

प्रशासनाच्या या सर्व सोयी सुविधामुळे अनेक पालखी सोहळा प्रमुख, वारकरी व भाविक यांनी खूप समाधान व्यक्त करून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व त्यांच्या टीमचे कौतुक केले. या वर्षाच्या आषाढी वारी पंढरपूर शहर प्रथमच खूप स्वच्छ दिसल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. रस्ते सफाई, कचऱ्याची विल्हेवाट, शौचालयाची व्यवस्था व पाण्याची उपलब्धता अशा सुविधामुळे भाविकांना याचा खूप लाभ झाला. प्रशासनाच्या सुविधामुळे भाविकांना एवढ्या मोठ्या गर्दीतही प्रशासन अत्यंत उत्तम प्रकारे काम करत असल्याचे दिसले.

**पंढरपूर शहर व पालखी मार्गावर शौचालयाची स्वच्छता**

शहरात सुलभ शौचालय, नगरपालिकेच्या वतीने बांधण्यात आलेले कायमस्वरूपी शौचालय व मुख्य गर्दीच्या ठिकाणी, मंदिराकडे प्रवेश करणाऱ्या मुख्य रस्त्यावर तात्पुरती शौचालय ठेवण्यात आली. या सर्व शौचालयाच्या ठिकाणी नगर परिषदेच्या वतीने मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध करून देण्यात आले. त्याप्रमाणेच हे शौचालय भरल्यानंतर त्यातून मैला उचलून घेऊन जाण्यासाठी नगरपालिकेने सक्शन मशीन वाहनाची व्यवस्था ठेवलेली होती. तसेच प्रत्येक शौचालयाच्या ठिकाणी साफसफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याने वेळोवेळी शौचालये स्वच्छ केली जात असल्याने खूप चांगल्या प्रकारे स्वच्छता झालेली दिसून येत आहे. येथे आलेल्या भाविकांना सुलभ इंटरनॅशनल संस्थेचे शौचालय 21 ठिकाणी 2062, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधणेत आलेले कायमस्वरुपी शौचालये 2 ठिकाणी 1864, एमटीडीसीमार्फत बांधण्यात आलेले 2 ठिकाणी 226, तिर्थक्षेत्र विकास आराखडयामार्फत उभारणेत आलेले कायम स्वरूपी शौचालये ठिकाणे 9 ठिकाणी 136, नगरपरिषदेमार्फत उभारणेत आलेले कायम स्वरूपी सार्व. शौचालये 21 ठिकाणी 109 व प्री फॅब्रीकेटेड शौचालये 54 ठिकाणी 1800 सिट्स अशा प्रकारचे स्वच्छ मुबलक पाण्यासह शौचालये उपलब्ध झाल्याने भाविकांनी या शौचालयाचा मोठ्या प्रमाणात वापर केला.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे सर्व शौचालय स्वच्छ ठेवले जात आहेत का नाहीत याची खात्री स्वतः वेळोवेळी भेट देऊन केली. यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून त्या सर्व साफसफाई कर्मचाऱ्यांना शौचालये वेळेत स्वच्छ झाले पाहिजेत यासाठी त्यांच्यावर सुपरवायझिंग करणाऱ्या कर्मचाऱ्यांची बैठका घेऊन सफाई कर्मचाऱ्यांनी शौचालय वेळेत स्वच्छ करण्यासाठी प्रयत्न करावेत असे निर्देश त्यांनी दिले होते. सुपरवायझर यांच्याशी झालेल्या बैठकामुळे साफसफाईच्या कामाला अधिक गती आलेली होती.

**वारीचा मुक्काम संपला की तात्काळ स्वच्छता मोहीम**

संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी व जगदुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी यांचा सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर पंढरीच्या दिशेने जाताना ज्या ज्या ठिकाणी मुक्काम आहे त्या ठिकाणचा मुक्काम संपल्यानंतर संबंधित नगरपंचायत व ग्रामपंचायत यांच्या वतीने तात्काळ स्वच्छता मोहीम हाती घेऊन मुक्कामाचे ठिकाणावरील साफसफाई केली जात असे. यावर्षी वारीमध्ये प्रथमच या पद्धतीने स्वच्छता मोहीम राबवल्याने स्थानिक नागरिक प्रशासनाच्या या कामाबद्दल समाधान व्यक्त करत होते.

**मुख्यमंत्री यांच्याकडून स्वच्छतेबाबत प्रशासनाचे कौतुक**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आषाढी वारी पूर्वी पालखी मार्ग व पंढरपूर शहरातील विविध सोयी सुविधा बाबत प्रत्यक्ष पाहणी केली तसेच भाविकांशी संवाद साधला. श्री शिंदे यांनी यावेळी शौचालयातील स्वच्छता स्वतः जाऊन पाहिली. पालखी मार्ग व पंढरपूर शहरातील रस्ते व शौचालयाची स्वच्छता बद्दल त्यांनी प्रशासनाचे कौतुक केले.

**पंढरपूर शहर स्वच्छ व सुंदर ठेवून भाविकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी शहराचे पाच भाग**

आषाढी वारीत आषाढी एकादशीला किमान 15 लाख वारकरी या भाविक पंढरपूर शहरात येऊ शकतात याचा अंदाज घेऊन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली इन्सिडेंट कमांडर, जिल्हा नगरपालिका प्रशासन व पंढरपूर नगरपरिषद यांनी पंढरपूर शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी शहराचे पाच भाग करून या पाच भागांमध्ये स्वच्छतेची धुरा सांभाळण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांनी ब्रांच डायरेक्टर ऑफ हायजिन म्हणून जिल्हा प्रशासन अधिकारी विना पवार यांची नियुक्ती केली. त्यांच्या अंतर्गत पाच वेगवेगळ्या ठिकाणी एकूण 13 मुख्याधिकारी हे स्वच्छता नोडल अधिकारी म्हणून नेमले होते .या परिसरात चंद्रभागा वाळवंट, पत्रा शेड परिसर ,65 एकर परिसर, प्रदक्षिणामार्ग व मंदीर परिसर, बसस्थानक , अर्बन बँक असे 5 भाग करण्यात आले होते.

स्वच्छतेच्या दृष्टीने चंद्रभागा वाळवंट हा सर्वात आव्हानात्मक भाग असल्यामुळे तेथे एकूण सात भागात सात मुख्याधिकारी नेमले होते. प्रत्येक मुख्याधिकारी यांच्याकडे शहर समन्वयक, शहर अभियंता, स्वच्छता निरीक्षक, नप लिपिक तसेच सफाई कर्मचारी अशी प्रत्येकी वीस जणांची टीम नेमलेली होती. या कामाकरीता 50 स्वयंसेवकांनी सुद्धा मदतीचा हातभार लावला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आषाढी वारी पूर्वी सोयीसुविधाचे पहाणी करताना चंद्रभागा वाळवंटात स्वच्छतेच्या दृष्टीने आणखी मनुष्यबळ वाढवण्याबाबत सुचित करण्यात आले होते तसेच चंद्रभागा नदीकडेच्या दोन्ही बाजूचे स्वच्छता वेळोवेळी करून संपूर्ण वाळवंट स्वच्छ राहील याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याप्रमाणे प्रशासनाने अत्यंत चोखपणे नियोजन करून वाळवंट परिसर स्वच्छ ठेवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. चंद्रभागा वाळवंट परिसरात भाविक मोठया प्रमाणात येतात, या परिसरात वारकऱ्यांना, भाविकांना, महिलांना स्वच्छतेची सुविधा देण्याकरता एकूण 400 तात्पुरते शौचालय उभारले गेले होते, पूर्ण शहरात एकूण 2000 तात्पुरते शौचालय उभारले गेले होते, या शौचालयाची वारंवार स्वच्छता, निजंर्तुकीकरण त्यातील मैलाचे सक्शन तसेच शौचालयासाठी पाण्याचा पुरवठा व हँडवॉशची सुविधा व वारंवार स्वच्छता करून घेण्यासाठी या सर्व मुख्याधिकारी व त्यांच्या जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडली तर पंढरपूर मुख्याधिकारी प्रशांत जाधव यांनी सर्व पथकास आवश्यक साधनसामग्री अत्यंत तत्परतेने उपलब्ध करून दिली.

**आषाढी एकादशी पासून पंढरपूर शहर स्वच्छता**

आषाढी एकादशीच्या रात्रीपासुनच 24 तास स्वच्छता व कचरा गोळा करण्याचे काम हाती घेतले असुन याकामी शहरासह 65 एकर, नदीपात्र वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, दर्शनबारी पत्राशेड गोपाळपुर रोड, मंदिर परिसर आदी ठिकाणच्या स्वच्छतेसाठी 1348 स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून, यामध्ये 348 कायम तर 1000 हंगामी कर्मचारी तसेच इतर नगर पालिकेकडून ही स्वच्छतेसाठी कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत.

65 एकर, नदीपात्र वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, दर्शनबारी पत्राशेड गोपाळपुर रोड, मंदिर परिसर आदी ठिकाणी जंतुनाशक फवारणीसह, मँलेथॉन पावडर, ब्लिचिंग पावडर नगरपालिकेच्या वतीने वेळोवेळी टाकण्यात येत आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत तसेच 41 घंटागाडी द्वारेही कचरा गोळा करण्याचे काम यात्रा कालावधीत अहोरात्र चालु आहे. शहरामध्ये कचरा त्वरीत उचलण्यासाठी आरोग्य विभागाकडील 8 टिपर, 2 कॉम्पॅक्टर, 1 डंपरप्लेसर, 4 ट्रॅक्टर ट्रॉल्या व जेसीबीच्या सहाय्याने दररोज 70 ते 80 टन कचरा उचलण्यात येत आहे. यात्रा कालावधीमध्ये स्थानिक नागरिकांनी व भाविकांनी आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी प्रशासनास आतापर्यंत चांगले सहकार्य केले आहे.

### वात्रटिका

**उरणः काय उरले**

कधी धर्म आडवा येतो
तर कधी आडवी येते जात...
आजूबाजूने कधी तर कधी
घरातूनच घडतो घात...
पुरोगामी महाराष्ट्राची पुन्हा
शरमेने मान खाली गेली...
तिकडे ऑनर किलिंग तर
इकडे उरण घटना घडली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# पुणे सोलापूर महामार्गावरील सावळेश्वर, शेटफळ येथील अंडर बायपासचा प्रश्न संसदेत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूर-पुणे महामार्गावरील जिल्ह्यातील शेटफळ आणि सावळेश्वर येथे उड्डाण पूल, अंडर बायपास करणे आणि जिल्ह्यातून जाणाऱ्या इतर महामागार्ची देखभाल व दुरुस्ती वेळेवर करण्यासंदर्भात संसदेच्या अधिवेशनामध्ये प्रश्न उपस्थित केला आहे. त्यास केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. सोलापूर शहर व जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय महामागार्चे जाळे पसरले आहे. या राष्ट्रीय महामार्गामुळे अनेक गाव महामार्गाला जोडली गेली आहेत. मात्र या महामार्गाचे काम होत असताना कित्येक गावामध्ये अंडरपास करण्यात आले नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.

यामध्ये प्रामुख्याने सोलापूर पूणे महामार्ग वरील शेटफळ येथे अंडरपास आणि सावळेश्वर गाव येथे उड्डाणपूल अथवा अंडरपास नसल्यामुळे नागरिकांची मोठ्या गैरसोय होत असून वाहतुकीसही अडथळा निर्माण होत होत होता.

# छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालयात नवीन एम आर आय मशीन उपलब्ध करून द्या... राष्ट्रवादीची मागणी

## वैद्यकीय शिक्षण मंत्री नामदार श्री हसनजी मुश्रीफ साहेब यांना दिले निवेदन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री हसनजी मुश्रीफ साहेब आज सोलापूर दौऱ्यावर आले असता सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर शहरच्या वतीने शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोउपचार रूग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय येथील एमआरआय मशीन कालबाह्य झालेली आहे. सोलापूर शहर हे गोरगरीब कामगार कष्टकरी मध्यमवर्गीयांचे शहर असून



शासकीय रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात असून त्यांच्या उपचारासाठी कालबाह्य टफ्फ मशीनमुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत त्यामुळे शासकीय रुग्णालयात नवीन तंत्रज्ञान असलेली टफ्फ मशीनची अत्यंत गरज असून त्याकरिता नवीन एम आर आय मशीन उपलब्ध करून द्यावी त्याचबरोबर सोलापूर शहरातील अनेक उद्योगपती सीएसआर फंडातून शासकीय रुग्णालयात सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता इच्छुक असून त्याकरिता शासनाची मान्यता लागते या मान्यतासाठी दिरंगाई होत आहे तरी तातडीने संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करून सीएसआर फंड वापरण्याकरिता मान्यता मिळवून द्यावी अशा आशियाचे दोन निवेदने आदरणीय मंत्री महोदय यांना दिले असता त्यांनी तात्काळ सोलापूरचे आधिष्ठाता श्री संजीव ठाकूर यांना सूचना केल्या सीएसआर फंड वापरण्याची मागणी असेल तर प्रस्ताव पाठवून द्यावेत त्याला शासनाकडून तात्काळ मान्यता दिली जाईल तसेच नवीन एम आर आय मशीनसाठी ही प्रस्ताव द्यावा डीपीडीसी किंवा राज्य शासनाच्या निधीतून लवकरात लवकर एम आर आय मशीन उपलब्ध करून दिले जाईल असे आश्वासन मंत्री महोदय यांनी दिले.

याप्रसंगी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान अल्पसंख्यांक प्रदेश कार्याध्यक्ष वसीम बुऱ्हाण ज्येष्ठ नेते शफी इनामदार जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले महिला अध्यक्ष संगीता जोगदनकर कार्याध्यक्ष चित्रा कदम अँड,सलीम नदाफ युवक कार्याध्यक्ष तुषार जक्का संघटक दत्तात्रय बडगंची युवती अध्यक्ष किरण माशाळकर सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव अल्पसंख्यांक अध्यक्ष आमिर शेख कार्याध्यक्ष संजीव मोरे वाहतूक आघाडी अध्यक्ष इरफान शेख वैद्यकीय सेवा अध्यक्ष बसवराज कोळी सोशल मीडिया अध्यक्ष वैभव गंगणे दक्षिण विधानसभा महिला अध्यक्ष प्रिया पवार कार्याध्यक्ष कांचन पवार प्रकाश झाडवबुके आयुब शेख मोहीन मुल्ला किरण शिंदे मनोज शेरला सामाजिक न्याय विभाग कार्याध्यक्ष अनिल बनसोडे जाहीर शेख किरण आवताडे आदी उपस्थित होते.

# सोलापूर शहर उत्तरसाठी काँग्रेसकडून सुदीप चाकोते यांच्या नावाला पसंती



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर उत्तर काँग्रेस विधानसभा मतदार संघाच्या वतीने कार्यकर्ता बैठकीच आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार विश्वनाथ अण्णा चाकोते, काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष चेतन भाऊ नरोटे, ज्येष्ठ कार्याध्यक्ष सुनील रसाळे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष सुदीप दादा चाकोते, माजी नगरसेवक चिदानंद वनारोटे,दत्तू बंदपट्टे, राजेंद्र कासवा, रियाज बागवान, एन के क्षीरसागर, कुमार वाले, माजी महिला शहराध्यक्ष हेमाताई चिंचोळकर, संजय शिंदे , अशोक कलशेट्टी, माजी नगरसेविका भारतीताई ईप्पलपल्ली, यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रारंभी कै बाबुराव अण्णा चाकोते यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

सोलापूर शहर उत्तर विधानसभा या मतदारसंघातील काँग्रेस पक्षाच्या शंभर निष्ठावंत कार्यकर्त्यांची बैठक शुक्रवारी देण्यात आली हा मतदारसंघ काँग्रेस पक्षाला सुटावा यासाठी जोर लावण्यात येत आहे. या बैठकीत शहर उत्तर मतदार संघासाठी काँग्रेस पक्षाकडून सेवा दल यंग ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष सुदीप चाकोते यांचे नाव सुचविण्यात आले.

बैठकीचे अध्यक्ष माजी आमदार विश्वनाथ चाकोते यांनी बोलताना या मतदारसंघाचा इतिहास सांगताना आजपर्यंत काँग्रेस पक्षाने अनेक वेळा प्रतिनिधित्व केले आहे. त्यामुळे काँग्रेसचा बालेकिल्ला भारतीय जनता पार्टीच्या हातून काढून घेण्यासाठी आपणाला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशी बोलावे लागेल. असे सांगताना मागील वीस वर्षात मतदार संघात विकास करण्यात भाजप अपयशी ठरला आहे आणि त्यामुळेच या मतदारसंघासाठी युवा, धाडसी, आक्रमक चेहरा म्हणून सुदीप चाकोते यांचे उमेदवार म्हणून नाव सुचविले.

सुदीप चाकोते म्हणाले, लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला चांगले यश मिळाले भारतीय जनता पार्टीचे तीस हजार मताधिक्य तोडण्यात आपण यशस्वी झालो या निवडणुकीत सर्वच समाजाने काँग्रेसला मतदान केले. लिंगायत समाजामधून तर भाजप विरुद्ध प्रचंड चीड निर्माण झाली आहे परंतु आपणाला आघाडीचा धर्म पाळायचा आहे. पण आपण या मतदारसंघासाठी जोर लावला तर निश्चित शहर उत्तर काँग्रेसला सुटेल.

याप्रसंगी बसवराज येरटे, प्रवीण वाले, शहर उत्तर काँग्रेस विधानसभा अध्यक्ष महेश लोंढे, विनायक अल्ले, गोविंद कांबळे, मल्लिनाथ रेशीमकर, अशोक कोळेकर, केदार म्हमाने, नूर अहमद नालवार, मल्लिनाथ सोलापुरे, सागर उबाळे, संजय गायकवाड, संजय कुराडे, चंद्रकांत टिक्के, अशऊदीन शेख,विकास येळेगावकर, जहांगीर तांबोळी, अनिल गुजार, दत्ता जाधव, शिरीष चव्हाण, गौरीशंकर पाटील, शशिकांत जेनुरे, नागनाथ वाडकर, धनाप्पा तळभंडारे, प्रवीण, शिवाजी मंगोळेकर, बसवराज जाभा, बाबा शेख, बसवराज प्रचंडे, श्रीकांत दसरी, निरंजन नवगिरे, महादेव हिंगमिरे, इसाक शेख, निखिल पवार, हनुमंत रुपनर, जब्बर शेख, प्रा.संघमित्रा चौधरी, नीता बनसोडे, संध्या काळे, विनाताई देवकते, सुनील कांबळे, तानाजी सावंत, नागनाथ भोसले, लिंगराज ताटीकोंडा, प्रवीण बत्तुल, विनूगोपाल जिंदम, राजू नीलगठी, लक्ष्मीकांत कायत, शहर उत्तरचे शंभरहून प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# नजीक पिंपरी येथे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या शाखेचे उद्घाटन

**कुरूल (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्याने आणि मोहोळ तालुक्याने नेहमीच शरदचंद्र पवार यांच्या विचारावर प्रेम केले आहे. राष्ट्रवादीचा भक्कम बालेकिल्ला म्हणून मोहोळ तालुका नेहमीच अग्रेसर राहिला आहे. कुणीही सोबत नसताना देखील लोकसभा निवडणुकीत जनता राष्ट्रवादीसोबत राहिली. त्यामुळे हाच करिष्मा जिवंत ठेवून विधानसभा निवडणुकीत असाच धमाका करायचा आहे. त्यामुळे या कालावधीत राष्ट्रवादीच्या प्रसार आणि प्रचार जोमाने करून मोहोळ तालुका पुन्हा एकदा राष्ट्रवादीमय करूया असे प्रतिपादन राष्ट्रवादी लीगल सेलचे प्रदेश सरचिटणीस अ‍ॅड. पवन गायकवाड यांनी केले.

मोहोळ तालुक्यातील नजीक पिंपरी येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या शाखेचे उद्घाटन करण्यात आले.



यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी युवक तालुकाध्यक्ष अ‍ॅड. विठोबा पुजारी, मनोज गायकवाड, भास्कर खटके, सरपंच अभिमान सरवदे, बाळासाहेब वाघमोडे, अतुल घुले, मायसिद्ध गजघाटे, विठ्ठल खरात, ऋषिकेश गायकवाड, अभिजीत सावंत, अक्षय वाघमारे यांच्या उपस्थितीमध्ये शाखा उदघाटन व प्रवेश सोहळा पार पडला.

यावेळी शाखा अध्यक्ष सुजित साबळे, निशांत गजघाटे, सोनू साबळे, ऋषिकेश गजघाटे, संजय सरवदे, प्रथमेश मोरे, लखन साबळे, आदेश सरवदे, प्रवीण सरवदे, सूरज सरवदे, चैतन्य सरवदे,करण सरवदे ,सुभाष सरवदे, अर्जुन सरवदे, विश्वजित साबळे, राम साबळे, सागर सरवदे, राहुल नरुटे, अमीर शेख, विवेक सरवदे, अर्पित सरवदे, अजय सोनवणे, बजरंग साबळे, अमोल गजघाटे, हणमंत साबळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बालाजी स्पेशालिटी केमिकल्स लि. कडून प्रशालेस स्मार्ट टीव्ही भेट




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** हॉटेल बालाजी सरोवर येथे सोलापूर महानगर पालिकेचे आयुक्त मा. शितल तेली -उगले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बालाजी अमाईन्स लि. सोलापूर या जगविख्यात कंपनीकडून उरफ फंडातून मोहोळ तालुक्यातील मसले चौधरी येथील विद्या निकेतन प्रशालेतील विद्यार्थी -विध्यार्थिनींना आधुनिक जगाची ओळख व्हावी तसेच ग्रामीण भागातील विध्यार्थ्यांच्या मनात तंत्रज्ञानाची गोडी निर्माण व्हावी या उदात्त हेतूने.

या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डी.राम रेड्डी,एन. राजेश्वर रेड्डी, उरफ विभागप्रमुख बिराजदार यांच्या हस्ते प्रशालेस स्मार्ट टी. व्ही.देण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. जनार्दन कादे, प्रशालेचे मुख्याध्यापक मा. राजेंद्र जाधव, शिक्षक प्रतिनिधी शिवानंद बोधले, कांत हजारे व विद्यार्थी उपस्थित होते.

# वाढदिवसाच्या औचित्य साधून पटवर्धन कुरोली प्रशाला येथे क्रीडा साहित्याचे वाटप

**कुरोली (कटूसत्य वृत्त):-** सामाजिक कार्यकर्ते सचिन नाईकनवरे यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून पटवर्धन कुरोली प्रशाला येथे क्रीडा साहित्याचे वाटप. वाढदिवसाचा वायफळ अनावश्यक खर्च टाळून सामाजिक बांधिलकी म्हणून आपण काहीतरी समाजाचं देणं लागतोय या भावनेतून फुल ना फुलाची पाकळी म्हणून सचिन नाईकनवरे



मित्र परिवार यांच्या वतीने क्रीडा साहित्य वाटपाची संकल्पना घेऊन प्रत्येक मित्राच्या वाढदिवसाच्या निमित्याने सामाजिक कार्य करण्याचा संकल्प धरूनच आज त्याची सुरुवात करून क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या सचिन नाईकनवरे यांनी क्रीडा साहित्याचे विद्यार्थ्यांना वितरण केले. यावेळी बळीराजा शेतकरी संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्ष माऊली जवळेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष नागेश उपासे, शाळेचे अध्यक्ष शंकर मलशेट्टी, खजिनदार नंदकुमार पाटील, युवा नेते बालाजी जवळेकर, विक्रम मगर, बालाजी उपासे, राधेश्याम पाटील, विकास उपासे, अशोक नाईकनवरे, स्वप्निल राऊत, सचिन जवळेकर तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक शिद सर, साबळे सर, जाधव सर, जवळेकर सर, बाबर सर, नाईकनवरे सर, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन डी देशमुख सर यांनी केले आभार पाटील सर यांनी मानले.

## Classified - छोटी जाहीरात

### विक्री

विविध डिझाईनचे फॅशनेबल स्ट्रेचेबल ब्लाउज विक्रीसाठी उपलब्ध. रेडिमेड ब्लाउज विक्रीचे प्रसिद्ध शॉप. रसगंध लेडीज वेअर, नवी पेठ, दिवेकर बेकरी समोर, सोलापूर
**मो - 9890232227**

### विकणे आहे

सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्कः 9881361260**

### पाहिजेत

सोलापूरात कामासाठी पाहिजेत. कॉम्प्युटर ऑपरेटर, अकाउंटंट, टेलीकॉलर, माकेर्टींग एक्झिक्युटिव्ह, सेल्समन, वर्क फ्रॉम होम डाटा एन्ट्री (लिखाण व टायपिंग काम) उपलबध आहे.
संपर्कः **9591409911 / 9272021110**

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### सद्‌गुरू दर्शन टूर

12/7/2024 **काशी अयोध्या, 6 ज्योतिर्लिंग,** फक्त 9000 रु. खर्च, **अष्टविनायक दर्शन,** 24/7/2024, 3000 रु. खर्च, **रामेश्वर कन्याकुमारी** 12000 रु. खर्च, बुकींग चालू आहे.
**संपर्क : 7083214757 मायनाळे**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 **सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## CHANGE IN NAME

**AAMERA IMTIYAZ SHAIKH** do hereby declare that my old name **AAMERA MOHAMMED ALI** has been changed to **AAMERA IMTIYAZ SHAIKH**, residing at 30, Dnyandeep Housing Society, Vikas Nagar, Hotgi Road, Solapur - 413 003 Maharashtra State Affidavit No. 4011 dated 27/07/2024.

## नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
**फोनः 9552619752**
कॉल/व्हॉटस्अ‍ॅप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

## R.K कन्स्ट्रक्शन्स



संपर्क पत्ता :- इंजि. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)
Mo. 9552547272, 8788832033

## कटूसत्य शब्दकोडे क्र.९२

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | | ३ | ४ | ५ | | ■ | ६ | ७ | ८ |
| ९ | | ■ | ■ | १० | | | ■ | ११ | | | |
| १२ | | १३ | ■ | | ■ | | ■ | १४ | | ■ | |
| | ■ | १५ | | | ■ | १६ | १७ | ■ | ■ | १८ | |
| | ■ | | ■ | १९ | २० | ■ | २१ | २२ | | | ■ |
| २३ | २४ | ■ | २५ | | | २६ | | | ■ | २७ | |
| २८ | | ■ | २९ | | ■ | | ■ | ३० | ३१ | | ■ |
| | ■ | ३२ | | | ■ | ३३ | ३४ | | | ■ | ३५ |
| ■ | ३६ | | ■ | ३७ | ३८ | ■ | | ■ | ३९ | ४० | |
| ४१ | | | ४२ | ■ | ४३ | | ■ | ४४ | | | ■ |
| | ■ | ४५ | | ४६ | | ■ | ४७ | | | ■ | ४८ |
| ४९ | | | ■ | | ■ | ५० | | | ■ | ५१ | |

**उभे शब्द :** १) भारताचे एक माजी पंतप्रधान २) जवळीक, चिकटून राहणे ३) दिल्लीचे मुख्यमंत्री ४) बड उलट लिहा ५) पंढरीला नियमित जाणारे भाविक ६) भारताचे एक माजी राष्ट्रपती-*** मुखर्जी ७) बोलावण्यासाठी दिलेली साद ८) डाळ शिजताना होणारा आवाज ११) बे पंचे १३) श्रीरामाने या सेनेच्या मदतीने लंकेवर विजय मिळवला १७) मेंदू १८) वास, गंध २०) राक उलट लिहा २२) भित्रा, भ्याड २४) किंमती ऐवज, वस्तू २५) पाकचे माजी पंतप्रधान-*** शरीफ २६) आश्चर्य ३१) नवा कोरा, न चुरघळलेला ३२) खर्चात केलेली बचत ३४) लग्नातील नवरी मुलगी ३५) एक म्हण-** करी काम ३६) आकाशात उंचावरून घिरट्या मारणारा पक्षी ३८) उन्हाळा (इंग्रजीत) ४०) सर्व (हिंदीत) ४१) पाण्यात विहरणारा एक सफेद रंगाचा पक्षी ४२) जरचा साथीदार ४४) सभोवताली घातलेला गर्दीचा वेढा ४६) श्रवणेंद्रिय ४७) पक्ष्याचे पंख, परंतु (हिंदीत) ४८) कुलुपाची चावी

**आडवे शब्द :** १) देशाचे एक माजी उपपंतप्रधान ६) नारायण राणे यांचे वृत्तपत्र ९) घराची तुळई १०) ताणला जाणारा लवचिक पदार्थ ११) मजबूत १२) तंबाखू वा इतर साहित्य ठेवण्याची छोटी पिशवी १४) हव्यास, स्वार्थी भावना १५) दहा गुणिले नऊ १६) सायकलचे चाक, कागदी दस्त्यांचे माप १८) वर्गातील मुलांची एकूण संख्या १९) वाढदिवशी हा कापतात २१) एक भाजप नेते-नितीन **** २३) श्रीविष्णू पत्नी, लक्ष्मी देवी २५) समोर झालेली दृष्टीभेट २७) निवडणुकीत उमेदवाराला हे दान करतात, व्होट २८) पांघरण्याचे उबदार वस्त्र २९) भाविकांचे पंढरपूरला पायी जाणे ३०) एक म्हण-बडा घर *** वासा ३२) रात्री चमकणारा किटक ३३) पटकन, लगेच ३६) डोंगरातील वळणाचा रस्ता ३७) लहान बाळाला ही टोचतात ३९) शपथ (हिंदीत) ४१) प्रगती, भरभराट ४३) पैसे (इंग्रजीत) ४४) श्रीमंतच्या विरूध्दार्थी शब्द ४५) राज्य चालविणारे शासन ४७) भाकरी थापण्याची मोठी थाळी ४९) रंग (इंग्रजीत) ५०) याची धाव कुंपणापर्यंत अशी एक म्हण आहे ५१) भारताची राजधानी

### शब्दकोडे क्र. ९१ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श्री | रं | ग | बा | र | णे | ■ | बि | हा | र | ■ | जा |
| मा | ग | ■ | ल | स | ■ | प | ट | क | न | ■ | ल |
| न | ■ | गा | भा | ■ | ज | ड | ■ | ■ | र | वि | ना |
| यो | ■ | व | र | दा | न | ■ | भा | त | ■ | ना | ■ |
| गी | ता | ■ | ती | ■ | ता | स | गा | व | ■ | य | न |
| ■ | प | सा | ■ | मा | ■ | म | का | ■ | स | क | स |
| च | ट | ई | ■ | क | स | ■ | र | ■ | ड | ■ | ■ |
| ह | ■ | बा | ल | प | ण | ■ | ■ | लो | क | स | भा |
| ल | ■ | बा | ग | ■ | ■ | स | द | न | ■ | ■ | र |
| ■ | पा | ■ | ब | ग | दा | द | ■ | ■ | च | पा | ती |
| जी | व | ल | ग | ■ | द | रा | र | ■ | र | न | ■ |
| त | ■ | ता | ■ | चो | र | ■ | वा | र | स | ■ | मे |

# महादेव कोगनुरे यांना जनतेची सेवा करण्याची संधी मिळावी म्हणून देवाकडे प्रार्थना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात सध्या प्रत्येक पक्षातील नेत्यांनी विधानसभेची उमेदवारी मिळावी म्हणून आपापल्या गॉड फादरकडे फिल्डिंग लावताना दिसून येत आहेत, तर काही नेत्यांना विधानसभेची उमेदवारी मिळावी स्वतः कार्यकर्ते देव पाण्यात ठेवून बसले आहेत.त्यातच आता दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून एक के फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा दक्षिण सोलापूर काँग्रेस नेते महादेव कोगनुरे यांना उमेदवारी मिळावी म्हणून असंख्य कार्यकर्त्यांनी आज सोलापूर येथील सिध्दारामेश्वरच्या मंदिरात तर शुक्रवार देवीचा वार असल्याने रूपाभवानी देवीच्या चरणी नतमस्तक होऊन आपल्या नेत्याला उमेदवारी मिळावी म्हणून साकडे घालून प्रार्थना केली. यापुढे आता दक्षिण सोलापूर विधानसभेची उमेदवारी मिळवण्यासाठी नेत्यामध्ये जोरदार रस्सीखेच पहायला मिळणार आहे. कारण



सध्या दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात इच्छुकांची संख्या अधिक आहे.अनेक नेते सध्या उमेदवारी मिळवण्यासाठी गाठी-भेटीवर जोर देत धडपड करताना दिसून येत आहेत. त्यातच आता महादेव कोगनुरे यांना दक्षिण सोलापूर विधानसभेची उमेदवारी मिळावी म्हणून स्वतः कार्यकर्ते सिद्धारामेश्वर व देवीच्या चरणी नतमस्तक होऊन प्रार्थना करत असल्याने आता पक्ष नेतृत्वाला ही उमेदवारी कोणाला द्यावी याचा प्रश्न पडला आहे. सध्या तरी यामुळे एम के फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांना कार्यकर्त्यांचा वाढता प्रतिसाद पहायला मिळत आहे. यापूर्वी ही केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे,नुतन खासदार प्रणितीताई शिंदे तसेच कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची भेट घेऊन कार्यकर्त्यांनी निवेदन सादर करुन महादेव कोगनुरे यांना उमेदवारी देण्याची मागणी केली होती.आज पुन्हा एकदा कार्यकर्ते एकत्रित येत महादेव कोगनुरे यांना उमेदवारी मिळावी म्हणून श्री सिद्धारामेश्वर च्या चरणी नतमस्तक होताना दिसून आले. यावेळी शिवशरण मुलगे, रविकांत चांदोडे, मल्लेशी मंडोली, रविकांत पाटील, किरण राठोड, हणमंत दिंडूरे, काशिम शेख, नागेश कोळी, ओंकार स्वामी, लक्ष्मीकांत बगले, आंबदास पाटील इत्यादींनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी महादेव कोगनुरे यांच्यावर प्रेम करणारे बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रताप क्रीडा मंडळाच्या बुद्धिबळ स्पर्धेत उच्चांकी ११२५ खेळाडूंचा सहभाग

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूज यांच्यावतीने श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने आणि जयसिंह मोहिते-पाटील व मदनसिंह मोहिते-पाटील यांच्या अमृतमहोत्सवी वाटचाली निमित्त रविवार, २८ जुलै रोजी स. म. शंकरराव मोहिते पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च शंकरनगर, अकलूज येथे आयोजित केलेल्या 'रत्नाई चषक' राज्यस्तरीय बुध्दिबळ स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र चेस असोसिएशन चे जॉईंट सेक्रेटरी व आंतरराष्ट्रीय पंच भरत चौगुले, मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते-पाटील, राष्ट्रीय बाल खेळाडू अनन्या बाळापुरे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.



यावेळी प्रदीपराव खराडे पाटील, उपाध्यक्ष पोपट भोसले-पाटील, प्राचार्य प्रवीण ढवळे, सचिव बिभीषण जाधव, स्पर्धा प्रमुख अभिजित बावळे व मंडळाचे सर्व संचालक,सदस्य उपस्थित होते. मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाने कला, क्रीडा, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबविले आहेत.

या स्पर्धेचा उदघाटनपर सामना राष्ट्रीय बाल खेळाडू अनन्या बाळापुरे विरुद्ध सकीना शेख यांच्यात होऊन स्पर्धेला सुरुवात झाली.

यावेळी अध्यक्षीय मनोगतात भरत चौगुले म्हणाले की, अकलूज हे बुद्धिबळ स्पर्धेचे भारतातील मोठे केंद्र होऊ शकते. प्रताप क्रीडा मंडळाने आयोजन केलेल्या स्पर्धेचा प्रतिसाद व नियोजन पाहता अशी स्पर्धा अद्याप कुठेही पाहिली नसून यामुळे मी भारावून गेलो आहे. सद्या जगात १९१ देश खेळत आहेत. अकलूजला राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा घेण्यासंदर्भात मी असोशिएशन कडे शिफारस करणार असल्याचे सांगितले.

मंडळाच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते पाटील या अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या की, प्रताप क्रीडा मंडळाच्या माध्यमातून १९९४ पासून गेली तीस वर्ष स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षी सोलापूर, सांगली, सातारा, पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, मुंबई, लातूर, धाराशिव आदी जिल्ह्यातून ११२५ खेळाडूंनी उच्चांकी सहभाग घेतला आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मानसिक स्वास्थ्य चांगले ठेवण्यासाठी छंद जोपासणे ही काळाची गरज आहे. स्पर्धेतील हार-जीत यापेक्षा सहभाग महत्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. ही स्पर्धा १० वर्षे वयोगट, १६ वर्षे वयोगट व खुला गट अशा तीन गटांसाठी आयोजित केली आहे.

वेगवेगळ्या गटासाठी वेगवेगळी परितोषिके व मेडल्स ठेवलेली आहेत.

या स्पर्धेत उत्कृष्ट पुरुष व महिला पालक, सर्वात लहान व ज्येष्ठ खेळाडू आणि सर्वाधिक सहभाग शाळा, क्लास यांना स्वतंत्र बक्षिसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी ६० कॅश प्राईज, १०१ ट्रॉफीज, १०१ मेडल तसेच प्रत्येक गटात ६० पेक्षा अधिक बक्षिसे ठेवलेली आहेत.

खेळात पालकांचा सहभाग वाढावा आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून ३ महिला व पुरुष पालकांना स्वतंत्र बक्षीसेही देण्यात येणार आहेत. याशिवाय माळशिरस तालुक्यातील खेळाडूंनाही संधी मिळावी या उद्देशाने तिन्ही गटामध्ये तालुक्यातील खेळाडूसाठी स्वतंत्र बक्षिसे देत आहेत.

प्रास्ताविक स्पर्धा प्रमुख अभिजित बावळे यांनी केले. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी, राजकुमार पाटील यांनी केले.

# कमीशनवाढी संदर्भात व विविध मागण्या बाबत मंत्रालयामध्ये बैठक

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या वतीने 2 जुलै रोजी कमीशन वाढीसाठी व विविध अडचणीसाठी राज्यामध्ये सर्व जिल्हा ठिकाणी एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या वतीने अन्न नागरी पुरवठा खात्याचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल व सर्व उपसचिव यांच्या उपस्थितीत मुंबई येथे बैठक पार पाडली.यावेळी अखिल महाराष्ट्र राज्य धान्य दुकानदार महासंघ संघटनेचे राज्य अध्यक्ष डी एन पाटील,ज्येष्ठ उपाध्यक्ष राजेश अंबुसकर, जनरल सेक्रेटरी चंद्रकांत जी यादव व सोलापूर जिल्हा महासंघ जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक तसेच इतर जिल्हा मधील जिल्हाध्यक्ष उपस्थित होते.



यावेळी महासंघ राज्य संघटनेकडून कमिशन वाढीबाबत व भारत ब्रँड अंतर्गत वस्तूच्या विक्री बाबत प्राधान्याने मुद्दा लावुन धरण्यात आला. दरमहा तहसीलकडुन कमीशन वाटपा व्हावे तसेच शासनाने दिलेल्या नवीन मशीन कसलेही चालत नसल्याबाबत निदर्शनास आणून दिले.तसेच सोलापूर जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक यांचे वतीने सांगण्यात आले कि जिल्ह्यामधील सर्व तालुकाचे इंष्टाक पूर्तता करावी यामुळे धान्यापासून वंचित असणारे लाभार्थी यांना धान्य मिळण्यास मदत होईल व प्रति महिना धान्य उचलणाऱ्या रेशनकार्ड धारकांसाठी सुद्धा त्या रेशन कार्ड धारकाला वैयक्तिक कारणास्तव धान्य घेणे शक्य झाले नाही तर त्यांना पुढील महिन्यांमध्ये कॅरी फॉरवर्ड हा ऑप्शन देऊन मागील धान्य देण्याची मुदतवाढ प्रति महिना मिळावी जेणेकरून ते लाभार्थी धान्यापासून वंचित राहणार नाहीत अशा इतर विविध मागण्या व अडचणीवर सकारात्मक चर्चा झाली.

# महाराष्ट्राला ठेंगा दाखविणाऱ्यांना जनता माफ करणार नाही : सुरवसे-पाटील

**पुणे :** केंद्र सरकारने मांडलेल्या अर्थसंकल्पामध्ये राज्याच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आश्वासनांची खैरात केली. मात्र, बिहार-आंध्रसाठी पाऊस, तर महाराष्ट्र कोरडाच ठेवला आहे. काँग्रेसच्या अर्थसंकल्पाची कॉपी करून जनतेची दिशाभूल केली आहे. महाराष्ट्रा ठेंगा दाखविणाऱ्यांना जनता कधीच माफ करणार नाही, असे प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील यांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपने सपाटून मार खाल्ल्यानंतर विधानसभेसाठी सावध पवित्रा घेतला आहे. जुन्याच योजनांना पॉलिश करून नव्याने जाहीर केल्याचे दाखविले असल्याने सामान्यांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे. गृहिणींसाठीच्या गॅसच्या किमतीबाबत कुठेही उल्लेख नाही. गॅस दररोज लागणारी गोष्ट आहे, तर मोबाईल, चार्जर स्वस्त केला, ही बाब दररोज लागणारी नाही. लाडक्या बहिणीला दीड हजार रुपये देणार आणि दुसरीकडे महागाई वाढवून ती दुपटीने वसूल करण्याची नामी संधी सरकारने साधली आहे. रोजगार निर्मितीबाबत कुठलीही



ठोस उपाययोजना नाही, त्यामुळे बेकारी वाढून गुन्हेगारी वाढण्याची भीती वाटत आहे. केंद्र सरकारने सामान्यांना विकास पाहण्यासाठी दुर्बिण दिली, तर बरे होईल. मागिल दहा वर्षांमध्ये केंद्र सरकारने सामान्यांसाठी कोणत्या उपाययोजना राबविल्या ते एकदा जाहीर केले पाहिजे. तसेच राज्यामध्ये ईडी-सीडीचा वापर करून फोडाफोडीचे राजकारण करून सरकार अस्थिर करण्याचे काम केले आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपच्या नाकर्तेपणाला कंटाळून चारशे पारचा नारा जनतेने फोल ठरविला आहे.

# 12 विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय योगासन व बुद्धीबळ स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा क्रिडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने उत्तर सोलापूर तालुकास्तरीय बुद्धिबळ व योगासन स्पर्धा जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मिडियम स्कूल येथे पार पडल्या या स्पर्धेमध्ये जिजाऊ ज्ञान मंदीर इंग्लिश मिडियम स्कूल व विजयसिंह मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालय कोंडी येथील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेमध्ये उत्तुंग भरारी घेतली आहे.



या स्पर्धेमध्ये जिजाऊ ज्ञान मंदिर संकुलातील विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक यश प्राप्त केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

१४ वर्ष वयोगटां मध्ये मुलं व मुली: योगासन स्पर्धेत
१) आविष्कार प्रसेंजित काटेः प्रथम क्रमांक
२) धनराज रमेश साठे : तृतीय क्रमांक
३) विरेंद्र भिवाजी भोसले : सहावा क्रमांक
**तर मुलीमध्ये**
१) प्रज्ञा नारायण नीळ प्रथमः क्रमांक
२) सह्याद्री पंडित नीळः तृतीय क्रमांक
17 वर्ष वयोगटां मध्ये :
१) शंभुराजे नागेश जाधवः दुसरा क्रमांक
**** १९ वर्ष वयोगटांमध्ये : मुलांमध्ये मध्ये**
१) अभिषेक बालाजी सुरवसे : दुसरा क्रमांक
२) समर्थ मारूती शेंडगेः तृतीय क्रमांक
तर मुलींना मध्ये
१) श्रेया अरुण विश्वकर्माः दुसरा क्रमांक
२) स्नेहा संतोष साठेः तिसऱ्या क्रमांक
चेस (बुध्दिबळ) या मध्ये
१४ वर्ष वयोगट मुलीमध्ये
१) प्रज्ञा नारायण नीळ दुसरा क्रमांक तर
**१७ वर्ष वयोगट मुलामध्ये**
१) रोशन रमेश बड़ोदियाः दुसरा क्रमांक

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जाणता राजा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष गणेश नीळ म्हणाले, आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये यशाच्या मार्गावरून जाणाऱ्या अनेक विद्यार्थी असतात परंतु यश मिळवणारे मात्र कमी असतात. जिजाऊ ज्ञान मंदिर मधील सर्व विद्यार्थ्यानी उत्कृष्ट कामगिरी केली या सर्व यशस्वी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांना जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये सुद्धा प्रचंड यश मिळावे. सर्व विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धेसाठी निवड झाल्यामुळे त्यांना पुढील कायार्साठी शुभेच्छा सर्व शिक्षकांनी दिल्या. आकाशात भरारी घेताना पक्षाला पंख असावे लागतात .विद्यार्थ्यांना सुद्धा उंच भरारी घेण्यासाठी चांगले शिक्षक रुपी पंखच असावी लागतात त्याशिवाय कोणताही विद्यार्थी उत्तुंग भरारी घेऊ शकत नाही सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील कायार्साठी लाख लाख शुभेच्छा प्राचार्य सुषमा निळ यांनी दिल्या. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना क्रिडा शिक्षक दिलीप भोसले सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष गणेश निळ, प्राचार्य सुषमा निळ, मुख्याध्यापिका अर्चना औरादे, मुख्याध्यापक वैभव मसलकर, संकेत मोरे, रवी कोतकुंडे आधीसह शिक्षक आणि यशस्वी विद्यार्थी उपस्थित होते.

# तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी बांधवांना दिलासा

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी बांधवांना दिलासा. आ. राजेंद्र राऊत सोलापूर जिल्हास्तरावर शिल्लक असलेल्या निधीमधून बार्शी तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीपिकाच्या नुकसानीच्या अनुषंगाने दुष्काळ निधी वितरीत करण्यास महाराष्ट्र शासनाने मंजूरी दिली आहे. सोलापूर जिल्हयातील बार्शी तालुक्यातील सोयाबीन पिकावरील पिवळा मोझेंक (बार्शी याबीन उत्पादक शेतकरी (उत्पादक शेतकरी बांधवांना-सोलापूर जिल्ह्यावर काय सोलापूर प्राप्त झालेल्या सोहळ्यातील अनुक्रमे बार्शी पीडित कुटुंबीय



त्यांच्या सामाजिक समस्यांचे नुकसान अनुंगाने कुमारी वितरीत करण्यास सुरुवाती महाराष्ट्राने मंजूरी दिली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी सोयाबीन पिक घेणे पिवळा मोझेंक.

# जुन्या पेन्शनसाठी धरणे अंदोलनास संयुक्त कृती समितीचा पाठींबा

**सोलापुर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य कर्मचारी जुनी पेन्शन संघटनेच्यावतीने आयोजित केलेल्या एकदिवसीय धरणे अंदोलनास सोलापुर जिल्हा खाजगी प्राथमिक शाळा संयुक्त कृती समितीच्यावतीने सक्रीय पाठींबा दिल्याची माहीती डॉ पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे प्रदेश महासचिव सुनिल चव्हाण व शिक्षक सेनेचे राज्य सरचिटणीस रमेश चौगुले यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य कर्मचारी जुनी पेन्शन संघटनेच्यावतीने रविवारी आक्रोश मोर्चा व एकदिवसीय धरणे अंदोलन आयोजित करण्यात आले आहे. दुपारी १२ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते जिल्हापरिषद येथील पुनम गेट पर्यंत हा मोर्चा निघणारआहे.१ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त असलेल्या सर्व विभागातील कर्मचार्यांना जुनी पेन्शन योजना लागु करावी या प्रमुख मागणीसाठी हा मोर्चा निघणार आहे.डीसीपीस, एनपीएस, जीपीएस यासारख्या फसव्या योजना सरकार कर्मचार्यांवर लादत आहे.

या योजनामुळे सेवानिवृत्त कर्मचार्यांचे भविष्य अंधकारमय आहे.जुनी पेन्शन योजना लागु करण्याचे केवळ आश्वासन देऊन सरकार फसवणुक करीत आहे.

या आक्रोश मोर्चा व एकदिवसीय धरणे अंदोलनात डॉ पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना,युवक शिक्षक कर्मचारी संघटना व अखिल भारतीय उर्दु शिक्षक संघटना सहभागी होणार आहेत.

या एकदिवसीय धरणे अंदोलनात शिक्षकांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे.असे आवाहन आप्पासाहेब पाटील, आप्पाराव इटेकर, विनोद आगलावे, अ.गफुर अरब, मुरलीधर कडलासकर, सचिन चौधरी,सोमेश्वर याबाजी, संतोष माशाळे यांनी केले आहे.

# अजित पवार मुख्यमंत्री व्हावेत ! किसन जाधवांचं अजमेर चरणी साकडं

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी पक्षाचे सर्वाधिक आमदार निवडून यावेत आणि अजित पवार हे महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री व्हावेत यासाठी राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य किसन जाधव यांनी आपल्या वाढदिनी राजस्थान राज्यातील अजमेर शरीफ दर्ग्यात बाबांच्या चरणी सहपरिवार साकडं घातलं तसेच सोलापूर शहरातील तमाम नागरिकांना सुखी समाधानी ठेवो यासाठी देखील त्यांनी यावेळी खाजा गरीब नवाज दर्ग्यात नतमस्तक होऊन त्यांनी प्रार्थना केली. नुकतेच 22 जुलै रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवस संपन्न झाला. अजित पवारांना उत्तम आरोग्य लाभो,दीघार्युष्य लाभो, अजितदादांचे जे महाराष्ट्रासाठी जे व्हिजन आहे ते व्हिजन पूर्ण व्हावे, अजित पवारांच्या नेतृत्वाखाली



महाराष्ट्राची प्रगती होवो दादा हे राज्याचे मुख्यमंत्री व्हावेत ही इच्छा मनात बाळगून गुरुवारी किसन जाधव यांनी आपल्या परिवारासह राजस्थान येथील अजमेर शरीफ दर्गा येथे जाऊन बाबाच्या चरणी नतमस्तक होऊन आपल्या इच्छेच्या पूर्ततेसाठी बाबांच्या चरणी प्रार्थना करून चादर चढवून दर्शन घेतले. तसेच दर्गा परिसरातील गोरगरीबांना अन्नदान वाटप करण्यात आले.यावेळी दर्गा कमिटीचे सदस्य जनाब सय्यद इब्राहिम चिस्ती, त्यांचे चिरंजीव कार्तिक किसन जाधव, पंढरपूरचे फारुक बागवान उपस्थित होते. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये सर्वाधिक आमदार घेऊन अजित पवार हे मुख्यमंत्री होतील. अजित पवार हे मुख्यमंत्री झाल्यानंतर आपल्या इच्छापूतीर्साठी इच्छा भगवंताची परिवार, सोलापूर शहरातील राष्ट्रवादी परिवार, जाधव परिवार आणि अजित दादा परिवारांसह पुनश्च एकदा अजमेर शरीफ बाबाच्या चरणी आम्ही नतमस्तक होऊ असेही यावेळी किसन जाधव यांनी बाबा चरणी प्रार्थना केली.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयात कारगिल विजय दिनानिमित्त शहिदांना विनम्र अभिवादन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत कारगिल विजय दिवसानिमित्त शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना सर्वप्रथम कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे यांनी कारगिल युद्ध आणि त्यात भारतीय जवानांनी गाजवलेले शौर्य आणि संपादित केलेला विजय याविषयी माहिती दिली. २६ जुलै हा भारतीय सैन्यासाठी शौयार्चा दिवस असुन यावर्षी आपला संपुर्ण देश २५ वा कारगिल विजय साजरा करीत आहे. 'कारगिल विजय दिवस' हा भारतातील प्रत्येक नागरिकांसाठी एक महत्वाचा



दिवस आहे. याच दिवशी कारगिल युद्धात भारताने आपल्या विजयाचा ध्वज फडकावला होता. हा दिवस 'कारगिल विजय दिवस' म्हणून साजरा केला जातो. भारत आणि पाकिस्तानमध्ये १९९९ साली युद्ध झालं होतं. हे युद्ध लडाखच्या कारगिलमध्ये एकूण ६० दिवस चाललं. २६ जुलै रोजी या युद्धाचा शेवट झाला. युद्धावेळी भारतीय लष्करानं पाकिस्तानी घुसखोरांना देशाबाहेर हाकलवून लावलं.या युद्धात भारताचा विजय झाला. कारगिल विजय दिवस हा युद्धात शहीद झालेल्या भारतीय जवानांच्या सन्मानासाठी, त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी साजरा केला जातो.जवळपास ६० दिवसांपेक्षा जास्त हे युद्ध सुरु होते. उंच पर्वतरांगा, कठोर हवामानाचा सामान करीत भारताने पाकिस्तानचा पराभव करून कारगिल युद्ध जिंकले. या युद्धात भारतीय सैन्याचे ५०० हून अधिक जवान शहिद झाले होते तर जवळपास एक हजारहून अधिक जवान जखमी झाले होते. पण अखेरच्या श्वासापर्यंत धैयार्नं लढा देत भारतीय सैन्यानं कारगिल युद्ध जिंकलं. याच २६ जुलैला आपल्या भारतीय जवानांच्या पराक्रमाच्या आणि जवानांच्या बलिदानाचे आठवणींना उजाळा देण्याकरिता सदरील श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थी व प्राध्यापक वृंद यांनी दोन मिनिटं मौन पाळून कारगिल युद्धात शहीद झालेल्या जवानाप्रती श्रद्धांजली वाहिली. सदरील कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापक यांची विशेष उपस्थिती होती.

# बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने पदाची सेवा पुरविणाऱ्या बेरोजगार सेवा सस्थांना मुदतवाढ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर या कार्यालयात 6 महिन्याच्या कालावधीकरिता बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने पदाची सेवा पुरविणाऱ्या नोंदणीकृत कार्यरत बेरोजगार सेवासुस्थांकडून सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर कार्यालयासाठी अकुशल 2 शिपाई उपलब्ध करून देण्याकरिता दरपत्रक मागविण्यात आले होते, ते विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे परत दरपत्रक सादर करण्यासाठी बेरोजगार सेवासंस्थाना 7 दिवसाची मुदतवाढ देण्यात येत असल्याची माहिती जिल्हा कौशल्या विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे प्र.सहायक आयुक्त हनमंत नलावडे यांनी दिली आहे. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णयानुसार दि 11 डिसेंबर 2015 मधील अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या व पदांची सेवा पुरविण्यास इच्छुक असणाऱ्या बेरोजगाराच्या सेवा सहकारी संस्थांनी आपले दरपत्रक व इच्छापत्र सदरची जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसांच्या आत कार्यालयास सादर करावे असे आवाहन जिल्हा कौशल्या विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे प्र.सहायक आयुक्त हनमंत नलावडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पार्क चौक, नॉर्थकोट, सोलापूर-413001 येथे प्रत्यक्ष अथवा दुरध्वनी क्रमांक.0217-2992956 द्वारे संपर्क साधवा.